UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

# Index


| Sr. No. | Article Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Illusion and Reality in R. K. Narayan's The English Teacher: A Reading | Dr. Vijaykumar Bandal | 1 |
| 2 | R. K. Narayan's The Vendor Of Sweets: Humorous And Comic Approach | Shaikh Afsar Nawaboddin | 6 |
| 3 | Seasonal Fluctuations in Some Physicochemical Characteristics of Vanjarwadi Dam Dist. Beed | Prashant V. Patil | 8 |
| 4 | Sol-gel synthesis, structural and magnetic properties of $Ni_{0.5}Zn_{0.5-x}Cu_xFe_2O_4$ ferromagnetic nanomaterial substituted by $Cu^{+2}$ | D. D. Birajdar | 12 |
| 5 | Understanding of Make in India Among Post Graduate Students: A Case Study of Kalburgi City (Karnataka) | Dr. Mahendrakumar Pattankar | 19 |
| 6 | Problems Of Women Entrepreneurs And Government To Promote Women Entrepreneurs | Dr. Rajkumar Salgar | 26 |
| 7 | A Comparative Study on Gender Specific and Academic Anxiety | Dr. Santosh kumar R.K | 34 |
| 8 | Social Norms and Impediments of Women Development in India | Dr. Shambunath | 38 |
| 9 | Geographycal Study of Crop Diversification In Parbhani District (Ms). | Dr. Hanumant Gandhale | 45 |
| 10 | Study o f Phyllosphere Mycoflora | Deepa A. Dhaware | 51 |
| 11 | An Experimental Study of The Use of Group Discussion to Assess Learning Attitudes of College Students | Dr. Balid Ujwala Shimon | 53 |
| 12 | Origin And Growth Of The Muslim Population Of Assam | Md. Sirajul Hoque | 56 |
| 13 | Current Issues and Challenges of Mid Day Meal in Far Flung Areas in Jammu And Kashmir State | Rakhi Devi | 64 |
| 14 | Mechanism for consumer strengthening in India | Dr.Dayma B.R., Sugare N.M. | 68 |
| 15 | स्त्री दु:खांची व्यथा: बाबल तेरा देस में | श्री.परमेश्वर वा.दहिफळे | 73 |

| | | | |
|---|---|---|---|
| 16 | मार्क्सवाद बनाम असंगघोष की आंबेडकरवादी कविता | डॉ.संजय जाधव, प्रा.मुंजाभाऊ डहाळे | 76 |
| 17 | धार्मीक आतंकवाद और विश्व राजनीती | विश्वनाथ हणमंतराव पवार | 79 |
| 18 | अज्ञेय की कहानियों में व्यक्त देश-विभाजन की त्रासदी | प्रा.आर.एम.खराडे | 82 |
| 19 | आधुनिक नारी की सशक्त तस्वीर - दौड | प्रा.डॉ.राजश्री भामरे | 87 |
| 20 | फणीश्वरनाथ रेणु की कहानियों में आँचलिकता का चित्रण | प्रा. सूर्यवंशी एस. एम. | 91 |
| 21 | "कबीर और उनकी सामाजिक चेतना वर्तमान के संदर्भ में" | नैन सिंह | 96 |
| 22 | "भारत सरताज़ जम्मू –कश्मीर के पर्यटक–स्थलों में पर्यटक और पर्यटन की संभावनाएं एवं चुनौतियां" | रवि कुमार | 100 |
| 23 | 'मैं घूमर नाचूँ' उपन्यास में प्रताड़ित नारी | डॉ. एकता रानी | 112 |
| 24 | मीडिया का सामाजिक दायित्व | पूजा शर्मा | 114 |
| 25 | मीडिया और बाज़ार | दीपिका शर्मा | 116 |
| 26 | वैश्वीकरण के परिप्रेक्ष्य में राम – विशेष संदर्भ तुलसीदास | सुशील कुमार | 119 |
| 27 | हिन्दी उपन्यासों में चित्रित देश प्रेम की भावना | दीपू शर्मा | 124 |
| 28 | भारतीय व्यवस्था आणि जागतिकीकरण (Indian system and Globalization) | प्रा.डॉ महेश नारायण मोटे | 127 |
| 29 | दलित साहित्य व सौंदर्यशास्त्र | प्रा. जयप्रकाश हुमणे | 135 |
| 30 | संल्लेखना : अध्यात्मिक व नैसर्गिक दृष्टीकोन | प्रा. शाहुराज नानाराव यादव | 138 |
| 31 | जनसाहित्य स्वरुप आणि प्रेरणा | प्रा. कांबळे विद्या मनोहर | 140 |
| 32 | भारतीय दर्शनातील 'आत्मा' : संकल्पना | रोहित सुधाकर गायकवाड | 146 |
| 33 | ईस्ट इंडिया कंपनी काळातील शैक्षणिक व्यवस्थेचा विकास | प्रा. डॉ. प्रविण पांडुरंगराव लोणारकर | 151 |
| 34 | राजस्थानाची चित्रकला, चित्र प्रकार आणि मुख्य शैली प्रकार | देशमुख गंगाधर बालाजीराव | 154 |
| 35 | कालिदासाच्या नाट्यकृतींमधील शृंगार रसाची अभिव्यक्ती | डॉ.शशिकांत नवनाथ बांगर | 159 |
| 36 | "राष्ट्र उभारणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक कार्यातील योगदान : एक चिकित्सक अभ्यास | डॉ. डी. एस. इटले | 164 |
| 37 | राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य | डॉ. जयदेव उध्दवराव मोहीते | 170 |

| | | | |
|---|---|---|---|
| 38 | वैद्य जीवकाचे मानसिक आरोग्यातील योगदान | प्रा. सारिका विष्णु केदार | 173 |
| 39 | आंबेडकरी चळवळीतील स्त्रिया | प्रा. सौ. खंदारे सिंधु परसराम | 178 |
| 40 | ई-प्रशासनाचा उद्देश आणि त्याचे फायदे | प्रा.डॉ. कहाळेकर सी. एम. | 185 |
| 41 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषावार प्रांतरचनेवरील विचार–''एक अभ्यास'' | घन आनंद लक्ष्मीकांत | 189 |
| 42 | वाल्मीकि रामायण में श्रीहनुमान् का दौत्यकर्म | नीतीश शर्मा | 195 |
| 43 | वर्तमान् परिदृश्य में यज्ञ की उपादेयता | शम्भू राम | 200 |
| 44 | हिंदी के विकास में बालशौरी रेड्डी का योगदान | डॉ. नारायण | 204 |

CURRENT GLOBAL REVIEWER
Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved Sr. No. 64310 | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143
Issue X Vol IV, March. 2018

# भारतीय दर्शनातील 'आत्मा' : संकल्पना

**रोहित सुधाकर गायकवाड**
*सोनोपंत दांडेकर कला, वा. श्री. आपटे वाणिज्य व एम. एच. मेहता विज्ञान महाविद्यालय, पालघर*

-------- (32) --------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावना:**

मानव हा जिज्ञासू प्राणी असल्यामुळे तो आत्म तत्त्वाला जाणण्यासाठी सतत प्रयत्नशिल असतो. आत्म ज्ञान हेच सर्व श्रेष्ठ ज्ञान आहे. आत्म्याला ब्रम्हाचेच रुप मानले जाते. म्हणून आत्मा आणि ब्रह्म एकच आहे. आणि आत्मज्ञान हेच ब्रह्मज्ञान आहे. आत्मज्ञानाद्धारेच मोक्ष प्राप्त केला जाऊ शकतो. 'स्वत:ला जाणा' या वाक्याद्धारे आत्म्याला जाणण्याची प्रेरणा मिळते. प्राचीन काळापासून ते आजपर्यंत अनेक विचारवंतानी आत्म्याविषयी आपापले विचार व्यक्त केलेले आहेत.

' वेद' हे भारतीय दर्शनातील आद्य व प्राचीन ग्रंथ आहेत. म्हणून भारतीय दर्शनातील 'आत्मा' संकल्पनेचा विचार करत असताना सर्व प्रथम आपल्याला वैदिक काळापासून सुरुवात करावी लागेल.

- **वेद** - वेदामध्ये एकेश्ववादी विचारधारा आढळून येते. एकाच परमसत्तेच्या रुपामध्ये एकच ईश्वर आहे आणि तोच विश्वात्मा आहे. सर्व देवगण त्याच विश्वात्म्याचे शरीर आहे. यावरुन वेदामध्ये ईश्वर आणि आत्मा यात तादाम्य स्थापित केलेले आहे. या जगातील आत्मा निष्काम, आत्मनिर्भर, अमर, स्वयंसिध्द, आनंदमय आणि शाश्वत आहे. आत्म्याचा या ज्ञानाद्धारेच मृत्यूला जिंकता येते. वेदातील हा अद्वैतवाद उपनिषद, गीता अणि वेदांताचा मूळ आधार आहे.

- **उपनिषद** - उपनिषदामध्ये आत्मा आणि ब्रह्माला एकच मानलेले आहे. छन्दोग्य उपनिषदामध्ये असे सांगितले आहे की, शरीरात राहणारा आत्मा वास्तवात ब्रह्मच आहे. जेव्हा हे नश्वर शरीर नष्ट होते. तेव्हा ब्रह्मामध्ये विलीन होतो. आत्मा हा नित्य व शाश्वत आहे कारण, तो कधीही जन्म घेत नाही व कधीही मरत नाही. तसेच आत्म्यामध्ये कोणतेही विकास किंवा बदल निर्माण होत नाहीत.

कठोपनिषदामध्ये आत्म्याविषयी अतिशय सुंदर पध्दतीने वर्णन केलेले आहे. हे शरीर रथ आहे, बुध्दी सारथी आहे, मन लगाम आहे, इंद्रिये घोडे आहेत, आत्मा रथाचा स्वामी आहे, यावरुन आपल्याला आत्म्याचे श्रेष्ठत्व दिसून येते. आत्मज्ञान हेच सर्वोच्च ज्ञान आहे. आत्म्याला जाणल्या नंतर सर्वच गोष्टह आपल्याला ज्ञात होतात काम, क्रोध इत्यादी वृत्तीचे दमन करुन श्रवण, मनन, निदिध्यासन याद्धारे प्राप्त केले जाऊ शकते. जेव्हा सर्व शारिरीक संस्कार नष्ट होतात, तेव्हाच आत्मज्ञान प्राप्त होते आणि आत्मसाक्षात्कारामुळेच ब्रह्मसाक्षात्कार होतो. आत्मा अजर-अमर आहे. आत्मा आणि ब्रह्म एकच आहे.

- **गीता** - गीतेमध्ये आत्म्याला अमर मानलेले आहे कारण की, आत्मा ना जन्मतो, ना मरतो. तो आजन्म, सनातन आहे. शरीर नष्ट झाल्यावरही तो राहतो. ज्याप्रमाणे मनुष्य जुने वस्त्र टाकून नवीन वस्त्र धारण करतो, त्याप्रमाणे जीवनात्मा जुन्या शरीराचा त्याग करुन नवीन शरीर धारण (प्राप्त) करतो.

आत्म्याला ना शस्त्र कापू शकते, ना अग्नी जाळू शकते, आत्मा तर नित्य, सर्वव्यापी, अचल व स्थिर आहे. तसेच देश कालातील आहे. आत्मा शरीराच्या अगोदरही होता आणि नंतरही राहतो तो सत्य, रज, तम इत्यादी गुणापासून वेगळा आहे.

- **चार्वाक दर्शन** - चार्वाक दर्शन हे जडवादी दर्शन आहे. चार्वाकांनी आत्मा, ईश्वर, पूर्नजन्म इत्यादी गोष्टींचा स्विकार केलेला नाही, चार्वाकांनी 'प्रत्यक्ष' हेच ज्ञानाचे एकमेव साधन मानले. त्यामुळे एखादे तत्त्व सत्य की असत्य हे पडताळून पाहण्याचे एकमेव साधन म्हणून त्यांनी प्रत्यक्षाचाच स्विकार केला. आत्म्याचे प्रत्यक्ष ज्ञान आपल्याला होत नाही,

म्हणून शरीरापेक्षा वेगळा असा आत्मा अस्तित्वात नाही. चार्वाकांनी चैतन्य विशिष्ट देहालाच आत्मा म्हटले आहे, चैतन्याची उत्पत्ती पृथ्वी, जल, अग्नी, वायू या चार जडतत्त्वाच्या संयोगातून होते. जडतत्त्वापासुन चैतन्याची उत्पत्ती कशी होते त्यावेळी चार्वाक असे समर्थन करतात की, ज्याप्रमाणे पान, कात, चुना यांच्या संयोगातून 'लाल रंगाची' उत्पत्ती होते. त्याच प्रमाणे पृथ्वी, जल, अग्नी, वायु यांच्या संयोगातून चैतन्याची उत्पत्ती होते आणि चैतन्य हा शरीराचा गुण आहे. चार्वाकांनी या चैतन्य विशिष्ट देहालाच आत्मा असे म्हटले आहे. तेव्हा शरीर नष्ट झाल्यानंतर आत्मा नावाचे कोणतेही तत्त्व शिल्लक राहत नाही. चार्वाकाच्या या मतावर आक्षेप घेतलेले आहेत, शंकराचार्य आणि वाचस्पति मिश्र यांच्या मते जर चैतन्य शरिराचा गुण असेल तर त्याचेही प्रत्यक्ष ज्ञान झाले पाहिजे. निर्जिव अवस्थेमध्ये शरीर राहु शकते परंतू चैतन्य नाही. म्हणून चैतन्य शरीरापेक्षा वेगळे आहे.

- **जैन दर्शन -** ज्या सत्तेला इतर भारतीय दर्शने आत्मा म्हणतात, त्यालाच जैन दर्शनाने जीव म्हटले आहे. म्हणून जीव आणि आत्मा एकाच सत्तेचे दोन वेगवेगळी नावे आहेत. जैनाच्या मते चेतन द्रव्यालाच जीव किंवा आत्मा म्हटले जाते. चैतन्य जीवाचे मूळ लक्षण आहे. चैतन्याच्या अभावी जीवाची कल्पना करणे अशक्य आहे. म्हणून जीवांची व्याख्या अशी केली जाते की, 'चेतना लक्षणे जीव: ' जीव स्वयंप्रकाशी आहे. तसेच तो इतर वस्तूनांही प्रकाशित करतो.

जैन दर्शनाच्या मते, जीव दोन प्रकारचे असतात. बध्द आणि मुक्त ज्याने मोक्ष प्राप्त केलेला आहे. अशा आत्म्याला मुक्त जीव म्हणतात आणि जे बंधनग्रस्त आहेत अशा आत्म्याला बध्द जीव म्हणतात.

आत्म्याचे अस्तित्व प्रत्यक्ष आणि परोक्ष दोन्ही प्रकारे सिध्द करता येते. 'मी सुखी आहे.' याचे प्रत्यक्ष ज्ञान मला होते. मी म्हणजेच आत्मा होय. आत्म्याचे परोक्ष ज्ञानही होते, अर्थात जो शरीराचा परिचालक आहे, प्रयोजनकर्ता आहे, ज्ञाता आहे, तोच आत्मा आहे. आत्म्याशिवाय शरिराचा विचार करणे अशक्य आहे. आत्मा अनंत ज्ञान, अनंत दर्शन आणि अनंत सामर्थ्य आहे. तसेच आत्मा नित्य व चेतन आहे. आत्मा ज्ञाता, कर्ता व भोक्ता आहे. अविद्येमुळे जीव बंधनग्रस्त होतो. जीव संपूर्ण शरीरामध्ये व्याप्त आहे आणि शरीरानुसार आकार धारण करतो. ज्या ठिकाणी एक जीव (आत्मा) आहे त्या ठिकाणी दुसरा जीवही प्रवेश करू शकतो. ज्या प्रमाणे दोन दिपक एका खोलीला प्रकाशित करतात, त्याप्रमाणेच दोन जीव (आत्मे) एकाच शरीरामध्ये निवास करू शकतात.

जैन दर्शनाच्या आत्म्यासंबंधी विचारावरही आक्षेप घेण्यात आलेले आहेत. जैनांनी आत्मा आणि जीव यांच्यात फरक केलेला नाही. तसेच आत्मा संपूर्ण शरीरामध्ये व्याप्त असूनही आत्मा आणि शरीर यांच्यामध्ये क्रिया - प्रतिक्रिया होत नसते. म्हणजे आत्मा आणि शरीर यांच्यातील संबंध जैनांनी स्पष्टपणे मांडलेला नाही.

- **बौद्ध दर्शन :** आत्म्यासंबंधी प्रश्न विचारल्यावर गौतम बुद्ध काहीही उत्तर देत नसत. आत्म्याचा त्यांना ना स्वीकार करायचा होता ना निषेध. म्हणून बौद्ध मौन राहत होते. त्यांच्या मते, जर मी आत्मा मानला तर क्षणिक वादाचे खंडन होईल. कारण बौद्धाने जगातील सर्व वस्तूला क्षणिक मानलेले आहे. म्हणून आत्मासुद्धा इतर वस्तूप्रमाणे परिवर्तनशील आहे. परंतु इतर दार्शनिक आत्म्याला स्थायी व नित्य मानतात. बौद्धाने नित्य, स्थायी आत्म्याचा स्वीकार केलेला नाही. आत्मा फक्त वाहणाऱ्या जलधारे प्रमाणे आहे. ज्याप्रमाणे नदीमध्ये जलधारा निरंतर परिवर्तीत होते. तरी सुद्धा आपल्याला ती एकच दिसून येते. त्याचप्रमाणे आत्मासुद्धा परिवर्तीत होतो. तरी सुद्धा तो आपल्याला नित्य व शाश्वत वाटतो.

बौद्ध दर्शन अनात्मवादी दर्शन आहे. 'सर्व क्षणिक' क्षणिक या मतानुसार सर्व काही क्षणिक परिवर्तनशील व अनित्य आहे. आत्मा चैतन्याचा प्रवाह आहे. या सतत प्रवाहामध्ये आपल्याला एकतेचा आभास होतो. नदीतील वेगवेगळे जलकण निरंतर प्रवाहामुळे आपल्याला ते एकच आहेत असा आभास निर्माण करतात. परंतु यामध्ये काहीही वास्तविकता नाही.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Half Yearly | Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol IV, | March. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

बौद्धाच्या अनात्मवादावरही आक्षेप घेण्यात आलेले आहेत. बौद्ध दर्शन हे विसरतो की, 'आत्मा नाही' हे म्हणणारे तत्वच आत्मा आहे. अर्थात आत्म्याच्या निषेधाद्वारेच आत्म्याचे अस्तित्व सिद्ध होते. तसेच स्थायी आत्म्याशिवाय कर्मसिद्धांत, स्मृती, प्रत्याभिज्ञा इत्यादीची व्याख्या करणे अशक्य आहे. तसेच जर आत्मा नसेल तर निर्वाणाचा काय अर्थ होईल ? न्याय - वैशषिक दर्शन : दर्शन वास्तूवादी आहे. त्यांच्या मते आत्मा एक द्रव्यआहे. ज्यामध्ये ज्ञान, सुख्र-दु:ख्र, राग-द्वैष, इच्छा, प्रयत्न इ. गुण विद्यमान असतात. वेगवेगळया शरीरामध्ये वेगवेगळा आत्मा आहे. आत्मा उत्पन्न होत नाही आणि नष्ट ही होत नाही. तर तो नित्य व विभू आहे. तसेच दिक्-कालापासून अलग आहे. आत्मा शरीर आणि इंद्रियापासून वेगळा आहे. शरीर आत्मा नाही. कारण कल्पना, विचार, स्मृती इ. मानसिक व्यापार इंद्रियाचे नाहीत तर ते आत्म्याचे आहेत, आत्मा ज्ञान नाही तर ज्ञाता व भोक्ता आहे.

आत्मा एक द्रव्य आहे. चैतन्य आत्म्याचा एक गुण आहे. परंतु चैतन्य आत्म्याचा स्वरूप गुण नाही तर तर आगंतूक गुण आहे. कारण आत्म्यामध्ये चैतन्याचा संचार तेव्हाच होतो जेव्हा त्याचा संपर्क मन, इंद्रिये आणि बाहय वस्तूशी होतो. या संपर्काशिवाय आत्म्यामध्ये आत्मा शरीरापासून पूर्णपणे मुक्त होऊन, सुख्र-दु:ख्रापासून दूर राहतो.

आत्म्यासंबंधी न्यायमत सुद्धा पूर्णपणे युक्तीसंगत मानता येत नाही कारण, चैतन्य आत्म्याचा स्वभावगुण आहे. आगंतुक किंवा आकस्मिक गुण नाही आणि आपल्याला हे अनुभवाद्वारे ज्ञात होते. वैशषिक दर्शन सुद्धा न्यायासारखे वस्तूवादी दर्शन आहे. त्यांचे आत्म्यासंबंधीचे विचार न्यायासारखेच आहेत. त्यामुळे त्याचा वेगळा उल्लेख करण्याची आवश्यकता नाही.

- **सांख्य दर्शन :** सांख्य द्वैतवादी दर्शन आहे. सांख्यानी प्रकृति आणि पुरुष ही दोन तत्व मानलेली आहेत. सांख्याचा पुरुष म्हणजेच आत्मा होय. तो शरीर, मन, इंद्रियेआणि बुद्धीपासून भिन्न आहे. तो अभौतिक आहे. त्याचा ना आदी ना अंत, पुरुष (आत्मा) अमर आहे. तो नित्य आहे, मुक्त आहे, शुद्ध आहे, पुरुष चैतन्य युक्त आहे. परंतु निष्क्रिय आहे. पुरुष सदैच ज्ञाता असतो, तो ज्ञानाचा विषय होत नाही. तसेच तो सुख्र-दु:ख्रापासूनही प्रभावित होत नाही. त्याच्यामध्ये कोणताही विकार निर्माण होत नाही. तो अपरिणामी, नित्य आहे. तो सर्वव्यापी व सनातन आहे. सांख्याने पुरुषाचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी काही प्रमाण ही दिलेले आहेत.

१) जगातील सर्व पदार्थ ज्याचे साधन आहेत तो चेतन पुरुष आहे.

२) जड प्रकृतीच्या विकासासाठी चेतन पुरुषाची आवश्यकता आहे.

३) जगातील सुख्र-दु:ख्र, उदासीनता याचा अनुभवकर्ता पुरुषच आहे.

४) मोक्षासाठी प्रयत्न करणारा पुरुषच आहे.

याशिवाय सांख्यानी पुरुषाची अनेकताही सिध्द करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१) वेगवेगळया व्यक्तीचा जन्म वेगवेगळया वेळी होतो, म्हणून पुरुष (आत्मा) अनेक आहेत.

२) जर एकच पुरुष असता तर समान क्रिया दिसून आली असती, परंतु प्रत्येकाची क्रिया वेगवेगळी दिसून येते. उदा. कोणी रडतो, कोणी हसतो, म्हणून पुरुष अनेक आहेत.

३) विभिन्न पुरुषामध्ये सत्व, रज, तम हे गुणही वेगवेगळे दिसून येतात म्हणून पुरुष अनेक आहेत.

अशा प्रकारे सांख्यानी वरील तर्काच्या सहाय्याने पुरुषाची सत्ता व अनेकत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सांख्याच्या मते मोक्षाच्या अवस्थेमध्ये आत्मा आपल्या सुद्धा चैतन्य स्वरुपाचाच अनुभव घेतो. अविवेक बंधनाचे कारण आहे आणि आत्मज्ञान हेच मोक्ष आहे.

सांख्याच्या आत्म्यासंबंधीच्या विचारावरही टिका करण्यात आलेली आहे. सांख्यानी आध्यात्मिक आणि व्यावहारिक पुरुषामध्ये गडबड केलेली आहे. एकीकडे पुरुषाला शुद्ध चैतन्य, साक्षी, नित्य, मुक्त, स्वयंसिद्ध, निरपेक्ष,

अध्यात्मिक पुरुषाच्या रुपामध्ये वर्णित केलेले आहे. आणि दुसरीकडे पुरुषाचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी व्यावहारिक जीवाचा आधार घेतलेला आहे. परंतु शुद्ध चैतन्य आत्म्याला शरीराचे गुण आणि क्रिया याद्वारे कसे समजावून घेतले जाऊ शकते?

- **योग दर्शन :** योग हे एक प्राचीन अध्यात्मिक दर्शन आहे. योग शब्द 'युज' धातूपासून तयार झालेला असून त्याचा शाब्दिक अर्थ समाधी असा आहे. समाधी असा आहे. समाधी म्हणजे शुद्ध भावनेसोबत आत्मा आणि परमात्म्याचे मिलन आहे. आत्मा परमात्म्यामध्ये विलीन होण्यालाच 'योग' म्हणतात. आत्मसाक्षात्कारासाठी योग एक साधन मानलेले आहे. योग आत्म्याला आपल्या खऱ्या स्वरुपाची ओळख्र करुन देते.

सांख्याप्रमाणेच योग सुध्दा स्विकार करतो की, विवेक ज्ञानानेच मुक्ती प्राप्त केली जाऊ शकते. आत्मा शरीर, मन, इंद्रियापासून भिन्न आहे. असे जेव्हा ज्ञान प्राप्त होते तेव्हा सर्व दु:खापासून निवृत्ती होते. कारण आत्मा स्वत:लाच या सर्व बंधनापासून वेगळा समजतो. तसेच तो देश, काल व कार्य इ. कारणापासून दूर आहे. आत्मा नित्य, मुक्त आणि शाश्वत आहे. शरीराचे बंधन आत्म्याला लागत नाही. हेच आत्मज्ञान होय.

सांख्याप्रमाणे योगसुध्दा मानतात की, जीव स्वतंत्र पुरुष किंवा आत्मा आहे. जीव स्वभावत: चैतन्य स्वरुप आहे. याचा संबंध स्थूल शरीराशी असतो. अज्ञानामुळे जीव हा चित् सोबत तादात्म्य स्थापित करतो आणि स्वत:ला चित्त समजतो. तसेच तो परिवर्तनशील चित्तवृत्तीमध्ये प्रतिबिंबित झाल्यामुळे त्याच्या मध्ये परिवर्तनाचा आभास निर्माण होतो. परंतु वास्तवात आत्म्यामध्ये कोणताही विकार किंवा परिवर्तन होत नसते. अज्ञानाने आत्मा चित्तामध्ये होणाऱ्या विकाराला स्वत:चे विकार समजतो. म्हणून तो सुख-दु:खाचा अनुभव घेतो आणि हेच आत्म्याचे बंधन आहे. यासाठी चित्त वृत्तीचा निरोध होणे आवश्यक आहे. तेव्हाच आत्मसाक्षात्कार होऊ शकतो. आत्मा तर नित्य, मुक्त व शुध्द चैतन्य स्वरुप आहे. हेच आत्मज्ञान आहे आणि हे आत्मज्ञान मोझ प्राप्तीचा मार्ग आहे.

- **मीमांसा दर्शन -** मीमांसा दर्शन वेदावर आधारित आहे. वेदाचे दोन भाग आहेत. एक कर्मकांड आणि दुसरा ज्ञानकांड, कर्मकांडाचे विवेचन मीमांसामध्ये तर ज्ञानकांडाचे विवेचन वेदांतामध्ये केलेले आहे. मीमांसक अनेकवादामध्ये विश्वास करतात, त्यांच्या मते जेवढे जीव आहेत तेवढया आत्मा आहेत. आत्मा अमर आहे, आत्मा शरीरापासून भिन्न आहे. पुढे ते म्हणतात चैतन्य आत्म्याचा स्वरुप गुण नाही तर आगंतुक गुण आहे. जेव्हा आत्म्याचा शरीर, मन आणि इंद्रियाशी संयोग होतो. तेव्हा चैतन्याची उत्पत्ती होते. मोझावस्थेमध्ये आत्म्याचा या विषयाशी संपर्क समाप्त होतो आणि आत्मा चेतन्य शून्य होतो. आत्मा कर्ताही आहे आणि भोक्ताही आहे.

भट्ट मीमासंक आत्म्यामध्ये क्रियेचे अस्तित्व मानतात. आत्म्यामध्ये स्थान परिवर्तन होत नाही परंतु परिणाम (रुप परिवर्तन) होते. आत्मा परिणामशील असून सुध्दा नित्य आहे तसेच आत्म्यामध्ये चित् आणि अचित् हे दोन अंश असतात. चित् अंशामुळे आत्मज्ञान प्राप्त होते तर अंचित अंशामुळे परिणाम प्राप्त होतात. परंतु प्रभाकर आत्म्यामध्ये क्रियेचे अस्तित्व मानत नाहीत.

- **अद्वैत वेदांत दर्शन -** शंकराचार्यांनी अद्वैत वेदांताचे प्रतिपादन केलेले आहे. "ब्रह्म सत्यं, जगन्मिश्या जीवो ब्रह्मैव नापर:!" ब्रह्मच एकमात्र सत्य आहे, जगत मिथ्या आहे. तसेच जीव आणि ब्रह्म अभिन्न आहेत म्हणजेच आत्मा आणि ब्रह्म यामध्ये द्वैत नाही. आत्मा आणि ब्रह्म अभेद आहेत. यालाच अंह ब्रह्मास्मि किंवा तत्त्वमसि याद्वारे व्यक्त केले जाते. तत्त्वमसिमध्ये त्वम् (जीव) तत् (ब्रहम) आहे. अर्थात ब्रह्म आणि जीव एक आहेत दोन्हीमध्ये काहीही भिन्नता नाही. दोन्हीही शुध्द चैतन्य आहेत असे सांगितले.

चैतन्य आत्म्याचा गुण नही तर त्याचे स्वरुप लक्षण आहे. आत्म्याचे अस्तित्व स्वप्रमाणित आहे. तो अद्वैत निरवयव, देशकालातीत, परमसत् आहे. आत्म्याचा निषेध करता येत नाही. कारण जो निषेध करत आहे तोच आत्मा आहे. अनंत आत्मा आणि परमात्मा एकच आहे. परंतु अविद्यमुळे आत्मा सीमित जीवासारखा प्रतीत होतो. शंकराचार्यांच्या मते इंद्रिय, मन, बुध्दी, अहंकार आणि शरीर या उपाधीने युक्त आत्माच जीव आहे. र्स्वव्यापी ब्रह्मच अविद्येमुळे वेगवेगळे जीव व जगताच्या रुपामध्ये प्रतीत होते. मुक्तीचा अर्थ या विद्यायुक्त उपाधीना नष्ट करुन निरुपाधिक ब्रह्माला जाणणे होय.

अज्ञानामुळे दोरीमध्ये सापाची प्रतीति होते आणि दोरीचे ज्ञान झाल्यावर साप नष्ट होतो. त्याचप्रमाणे मायेच्या प्रभावामुळे ब्रह्माचे वास्तविक रुप लपविले जाते आणि जगत् व जीव सत्य प्रतीत होऊ लागते. परंतु हे केवळ अभासमात्र आहे. म्हणून आत्माज्ञानामुळे मोक्षाची प्राप्ती होते. मोक्षाचा अर्थ ब्रह्म आणि आत्मा एकच आहे हे ज्ञात होणे. अशाप्रकारे पारमार्थिक दृष्टिकोनातून एकमात्र ब्रह्म सत्य आहे आणि आत्माच ब्रह्म आहे.

**उपसंहार :**

अशाप्रकारे आपण पाहतो की, भारतामध्ये सुरुवातीपासूनच आत्मतत्त्व हा एक संशोधनाचा विषय राहिलेला आहे. आणि भविषयामध्ये सुध्दा तो राहणार आहे. प्रत्येक दर्शनाने आत्म्यासंबंधी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. काही दर्शनांनी आत्म्याच्या अस्तित्वाचा निषेधही केलेला आहे. परंतु तेही आत्म्याच्या विचारापासून दूर राहू शकलेले नाहीत. आत्म्याचे अस्तित्व मानणाऱ्यासाठी आत्मज्ञान हेच सर्वोच्च ज्ञान आहे. कारण आत्मज्ञान हाच मुक्तीचा मार्ग आहे. आत्मा नित्य, मुक्त, शुध्द चैतन्य, शाश्वत, अमर आहे. तसेच तो दिक्-काल व कार्य-कारणापासून दूर आहे. हे सर्व ज्ञात होणे म्हणजेच आत्मज्ञान होय. शेवटी आत्मज्ञानामुळेच मोक्षाची प्राप्ती होऊ शकते. अर्थात आत्मज्ञान हे मोक्षाकडे नेणारा मार्ग आहे.

**संदर्भ :**


१. भारतीय तत्त्वज्ञान , श्रीनिवास दिक्षीत.

२. भारतीय तत्त्वज्ञानाचा ब्रह्द इतिहास, खंड १ ते ४ , ग.ना. जोशी

३. भारतीय दर्शन, शोभा निगम.

४. भारतीय दर्शन की रुपरेखा, हरेंद्र प्रसार सिन्हा.

५. वैदिक साहित्य, बलदेव उपाध्याय

६. भारतीय दर्शन, बसंतकुमार लाल.

७. A History of Indian Philosophy (vol. ५) Dasgupta S.N.

८. Indian Philosophy (Vol.३) J.N. Sinha.

Current Global Reviewer

ISSN 2319-8648


Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

UGC Approved Journal
Sr. No. 64310

Peer Reviewed

ISSN 2319-8648



Edited By
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

SHAURYA PUBLICATION

Publisher
Shaurya Publication
Latur-, Dist. Latur 413512

www.rjournals.co.in